मंगळवार, दिनांक २ जुलै, २०१९ रोजी मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः विनैसु-१५१९/प्र.क्र.९६/२९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै, २०१९

परिपत्रक :

मंगळवार, दिनांक २ जुलै,२०१९ रोजी मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे पुरसदृश परिस्थिती, रस्त्यांवर पाणी तुंबणे, सर्व मार्गावरील रेल्वेची वाहतुक व्यवस्था बंद असणे, यामुळे मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथील शासकीय/निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहणे शक्य नसल्याने विशेष नैमित्तिक रजा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, मंगळवार, दिनांक २ जुलै,२०१९ रोजी वर उल्लेखित कारणामुळे मुंबई व मुंबई उपनगर आणि ठाणे येथील शासकीय/निमशासकीय कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना त्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०७३११५२०३९१७०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by VALVI JANA JIVA
Date: 2019.07.31 15:30:58 +05'30'

(ज. जि. वळवी)
उप सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
४. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
५. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

६. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
९. जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगर/ठाणे.
१०. प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
११. आयुक्त, महानगरपालिका, मुंबई/ ठाणे.
१२. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
१३. महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई,
१४. उपमहालेखापाल, भविष्य निर्वाह निधी कक्ष, मुंबई,
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१७. उपसचिव (आस्थापना), मंत्रालयीन सर्व विभाग,
१८. निवडनस्ती, कार्यासन-२९.